**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र**

Estd. 1962
NAAC 'A' Grade

PHONE: EPABX – 0091-0231-2609000 CoE Office: 0231-2609068
B.A. Exam. Section: 0231-2609116 Website: www.unishivaji.ac.in
E-mail: ba.section@unishivaji.ac.in


---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/०१० दिनांक. ०९-१०-२०१९

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक
संलग्नित सर्व कला महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त परिसंस्था

विषय:- अंतर्गत/सत्रकर्म/प्रात्यक्षिक/गुणांची डाटा एंट्रीसाठी प्रणाली उपलब्ध करुन देणेबाबत.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें. २०१९ सत्रामधील बी.ए. अभ्यासक्रमाच्या भाग-३ सत्र-६ च्या परीक्षा दिनांक १६-१०-२०१९ पासून सुरु झाल्या असून सदर परीक्षांचे संपूर्ण कामकाज विद्यापीठ पोर्टलवर सुरु आहे. online.unishivaji.ac.in या लिंक मधून भाग-३, सत्र ५ व ६ चे टर्मवर्कचे गुण भरावयाचे आहेत. या अनुषंगांने खालील बाबींचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

१. बी.ए. अभ्यासक्रमाचे अंतर्गत/सत्रकर्म (टर्मवर्क), प्रात्यक्षिक परीक्षा, एन.एस.एस., शारिरीक शिक्षण, इत्यादी गुण आहेत ते महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगीनमधून व दुरशिक्षण प्रणाली मधील विद्यार्थ्यांचे सदरचे गुण संबधित अभ्यासकेंद्रांनी (स्टडी सेंटर्स) त्यांच्या लॉगीनमधून भरावयाचे आहेत.

२. महाविद्यालयातील संबधितानी अंतर्गत/सत्रकर्म, प्रात्यक्षिक परीक्षा, एन.एस.एस., शारिरीक शिक्षण, चे गुण ऑनलाईन पध्द्तीने दि. १५/११/२०१९ अखेर प्रणालीमध्ये बिनचूक भरणेचे असून त्याच्या ई-मार्कलिस्ट संबंधीत विषय शिक्षक/परीक्षक यांच्या सहीने प्रमाणित करुन बी.ए. परीक्षा विभागात दि. २१/११/२०१९ पर्यंत किंवा त्या पुर्वी पाठविणे आवश्यक आहे. गुण ऑन लाईनच भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. दूरशिक्षण प्रणालीच्या विद्यार्थ्यांबाबत सदरची प्रत दुरशिक्षण केंद्राच्या संबंधित समन्वयकांकडे जमा करावयाची आहेत.

३. निर्धारित तारखेनंतर आलेले गुण कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. अशा सुचना सर्व संबंधितांना देण्यात याव्यात. गुण भरण्याची ऑनलाईन सुविधा निर्धारित तारखेस बंद झाल्यानंतर ती पुन:श्च उपलब्ध करुन देता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

४.ऑनलाईन प्रणालितील विद्यार्थ्यांना बैठक क्रमांक प्राप्त झालेला आहे तथापी डाटाबेस मध्ये बैठक क्रंमांक आलेला नाही, जे विद्यार्थी संगणक प्रणालिमध्ये आलेले नाही तथापी त्यांना ऑड बैठक क्रमांक दिला आहे व सदर विद्यार्थ्यानी टर्मवर्क, प्रात्यक्षिक परीक्षा, एन.एस.एस., शारिरीक शिक्षण, पूर्ण केले आहे अशा विद्यार्थ्यांचे गुण न विसरता त्या त्या विषयाच्या ऑनलाईन गुणतक्त्यामध्ये लिहावेत.

कृपया मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख यांनी वरील माहिती सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे कार्यवाही करून घ्यावी व परीक्षा आणि निकालाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती.

कळावे,

आपली विश्वासू,

सही/-

उपकुलसचिव
(ऑन परीक्षा)

प्रत :-

१ संचालक/उपकुलसचिव दुरशिक्षणकेंद्र

२ आय. टी. विभाग,

यांना माहितीसाठी पुढील कार्यवाहीसाठी.